लोकमत

मडगावात आयोजन : केपे महाविद्यालयाचा पुढाकार

# 'रवींद्र केळेकर : जीवन आणि योगदान'वर १ रोजी परिसंवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**मडगाव** : गांधीवादी विचारवंत, स्वातंत्र्यसैनिक, आधुनिक कोंकणी चळवळीचे प्रणेते, भाषाशास्त्रज्ञ आणि ज्ञानपीठ पुरस्कार विजेते साहित्यिक रवींद्र केळेकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'रवींद्र केळेकर जीवन आणि योगदान' या विषयावर राष्ट्रीय परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. परिसंवाद कोंकणी विभाग, शासकीय कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, केपे यांच्या पुढाकाराने, साहित्य अकादमी, गोवा कोंकणी अकादमी आणि येथील रवींद्र भवन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ ऑगस्ट रोजी परिषद सभागृह, रवींद्र भवनमध्ये होणार आहे. सकाळी १० वाजता होणाऱ्या या चर्चासत्राचे उद्घाटक केपे सरकारी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. जयदीप भट्टाचार्य हे आहेत.



रवींद्र केळेकर

कोंकणीतील समीक्षक प्राचार्य भूषण भावे बीजभाषण करतील. प्रमुख पाहुणे गोवा कोंकणी अकादेमीचे सचिव दामोदर मोरजकर, खास आमंत्रित गिरीश रवींद्र केळेकर, तर उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थान गोवा कोंकणी अकादेमीचे प्रभारी अध्यक्ष वसंत सावंत हे भूषवतील. उद्घाटनसत्राचे स्वागत साहित्य अकादमीचे प्रभारी अधिकारी ओमप्रकाश नागर करतील तर प्रास्ताविक कोंकणी सल्लागार मंडळ, साहित्य अकादमीचे निमंत्रक मेल्विन रॉड्रिग्ज करतील. समारोप सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी लेखिका आणि संशोधिका सविता केरकर उपस्थित असतील. परिसंवादात मांडलेल्या शोधनिबंधांवरील मांडणीवरचे भाष्य केपे सरकारी महाविद्यालयातील कोंकणी विभागातील प्राध्यापक सुशांत नायक करतील.

या परिसंवादास सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केपे महाविद्यालयाच्या एम. ए. कोंकणी विभागाचे संयोजक सुशांत नायक यांनी केले आहे.

## 'साहित्यातील तत्त्वे आणि मूल्ये'यावर पहिले सत्र

- सकाळी ११.४५ वाजता सुरू होणाऱ्या पहिल्या सत्राचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. राजय पवार हे भूषवणार आहेत. रवींद्र केळेकर यांच्या साहित्यातील तत्त्वे आणि मूल्ये या विषयांतर्गत अनंत अग्नी (रवींद्र केळेकर यांच्या साहित्यातले तत्त्वज्ञान), नारायण देसाई (रवींद्र केळेकर यांच्या साहित्यातील सौंदर्यतत्त्व) राजू नायक (रवींद्र केळेकर यांच्या साहित्यातील निसर्ग आणि पर्यावरण) आदी मान्यवर तज्ज्ञ शोधनिबंध सादर करतील.

## रवींद्र केळेकर यांच्या साहित्यातला देश, प्रदेश आणि विश्व

दुपारी २.३० वाजता सुरू होणाऱ्या दुसऱ्या सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. पूर्णानंद च्यारी हे भूषवतील. 'रवींद्र केळेकर यांच्या साहित्यातला देश प्रदेश आणि विश्व' या विषयांतर्गत डॉ. प्रकाश वझरीकर (रवींद्र केळेकर यांच्या साहित्यातील भारतीयता) डॉ. हनुमंत चोपडेकर (कोंकणी भाषिक चळवळीचे दिशादर्शक : रवींद्र केळेकर) पय्यन्नूर रमेश पै (रवींद्र केळेकर यांच्या साहित्यातील वैश्विकता) आदी मान्यवर तज्ज्ञ शोधनिबंध सादर करतील.

Goa Main
Page No. 3 Jul 29, 2024
Powered by: erelego.com